**<u>रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ६४४/२०२१ मधील अर्ज</u>**
**<u>(निशाणी क्रमांक १३) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००११९५-२०२१)

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'विनाकैफियत' आदेश बाजुला सारून त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील मजकुराच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१४) देण्यात आले आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांचे म्हणणे असे आहे की, मार्च २०२० पासून कोर्टाचे कामकाज बंद होते त्यामुळे मूदतीमध्ये कैफियत देता आली नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतीमध्ये सूट दिलेली आहे. प्रतिवादींना महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीमध्ये कैफियत दाखल करता आलेली नाही व त्यास उशिर झाला. त्यामुळे प्र.वादी १ व २ यांनी उशिर जाणीवपुर्वक केलेला नाही. सबब, कैफियत दाखल करुन घेण्याची विनंती प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी केली आहे.

०२. वादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जात प्रखर विरोध केलेला आहे. जाणीवपुर्वक व कामकाज लांबविण्याच्या दृष्टिने कैफियत दाखल करण्यास प्रस्तुत प्रतिवादींनी विलंब केला असे वादींचे म्हणणे आहे. प्र.वादींना तारीख १७/०९/२०२१ रोजी समन्स बजावणी झालेली आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांतर्फे वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत दावा गहाण मूक्तिचा आदेश होण्याबाबत तसेच निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज अदयापपर्यंत पुराव्यास नेमण्यात आलेले नाही. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना दिनांक १५.०९. २०२१ व १७.०९.२०२१ रोजी समन्स बजावणी झालेली आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक ०७.०४.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा हा स्थावर मिळकतींविषयी असुन प्रतिवादींना कैफियत देण्यास संधी न दिल्यास त्यांचे फार नुकसान होणार आहे. अर्जात नमुद कारणे कैफियत दाखल करण्यास उशिर झाल्याबाबत संयुक्तिक कारण दाखवितात. प्रतिवादींनी कैफियत देण्यास जाणीवपुर्वक उशिर केल्याचे दिसत नाही. दाव्याकामी कैफियत दाखल करून म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्याने दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना कैफियत देण्याची संधी दिल्याने वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र त्याचवेळी प्रतिवादी क्रमांक १ व २ ने वेळेत कैफियत दाखल न केल्याने दाव्याचे कामकाजात विलंब झाला आहे, हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर ३० दिवसांत त्यांनी कैफियत देणे आवश्यक ठरते. प्रतिवादी क्रमांक १ व २ ने वादींना रक्कम रूपये ५००/- खर्च देण्याच्या अटीवर त्यांचेविरूद्ध झालेला 'विनाकैफियत' आदेश बाजुला सारून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे उचित होईल. पर्यायाने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

**<u>आ दे श</u>**

०१. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादींना रक्कम रुपये ५००/- एकत्रितपणे खर्च देण्याचे अटीवर प्रस्तुत अर्ज (नि.क्र.१३) मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी वादींना उपरोक्त रक्कम दिल्यावर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2022.07.22 11:22:59 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २१.०७.२०२२.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.